महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १२५ वा | दिनांक : १०/०२/२०२५ | वार : सोमवार

## वेदांनुसार डॉ. भीमराव आंबेडकर ब्राह्मणच ठरतात : अभिनेता राहुल सोलापूरकरांचे पुन्हा वादग्रस्त वक्तव्य



**पुणे :** अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी काही दिवसांपूर्वीच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अनाठायी विधान केले होते. आता राहुल सोलापूरकरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे. वेदांनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ब्राह्मणच होते, असे राहुल सोलापूरकर म्हणालेत. त्यांच्या या विधानानंतर आता आणखी एका नवीन वादाला तोंड फुटले आहे. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी यावरून संताप व्यक्त केला. राहुल सोलापूरकरने आता सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. हा जिथे दिसेल तिथेच त्याला जोड्याने मारायला हवा, अशी संतप्त प्रतिक्रिया आव्हाड यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्र्याहून सुटकेवेळी मोगलांना लाच दिली होती, असे विधान राहुल सोलापूरकर यांनी केले होते. या विधानामुळे राज्यभरातील शिवप्रेमींनी संताप व्यक्त केला होता. राहुल सोलापूरकरांच्या निषेधार्थ राज्यभरात अनेक ठिकाणी मोर्चे, आंदोलने करण्यात आली होती. त्यानंतर राहुल सोलापूरकर यांनी त्या विधानावरून दिलगिरी देखील व्यक्त केली होती. हा वाद थांबत नाही, तोच त्यांनी आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे.

रामजी सकपाळ नावाच्या एका बहुजन घरात जन्माला आलेला एक भीमराव, जो एक आंबेडकर नावाच्या एका गुरुजींकडून दत्तक घेतला जातो आणि त्यांचेच नाव घेऊन नंतर भीमराव आंबेडकर म्हणून मोठा होतो. त्याने प्रचंड अभ्यास केल्यामुळे वेदांमध्ये जसे म्हटले आहे. सब ब्रम्ह जानेती इति ब्राह्मण: म्हणजे अभ्यास करुन तो मोठा झालेला आहे. तसे त्या अर्थाने वेदानुसार भीमराव आंबेडकर ब्राम्हण ठरतात, असे राहुल सोलापूरकर यांनी म्हटले.

दरम्यान, राहुल सोलापूरकर यांच्या विधानावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी चांगलाच संताप व्यक्त केला. राहुल सोलापूरकरने आता सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. हा जिथे दिसेल तिथेच त्याला जोड्याने मारायला हवा, असे जितेंद्र आव्हाड म्हणालेत. याच्यासारख्या मनुवाद्यांनीच महाराष्ट्राचे, देशाचे वाटोळे केले आहे. राहुल सोलापूरकरने छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल माफी मागितलेली नाही. आता तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत बोलून सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. याच्या डोक्यावर नसलेले केस उगवावे लागतील; ते कसे उगवायचे, ते बहुजन अन् आंबेडकरवादी ठरवतील. या मनुवाद्यांनाच छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा का त्रास होतो, हेच समजत नाही. याला दिसेल तिथे तुडवा, असे जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

## मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांचा राजीनामा



**नवी दिल्ली :** मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी रविवारी संध्याकाळी राज्यपालांकडे राजीनामा सादर केला. नवीन मुख्यमंत्र्यांबाबतचा निर्णय एक-दोन दिवसात घेतला जाईल.

राज्यात २१ महिन्यांपासून सुरू असलेल्या हिंसाचारामुळे बिरेन सिंह यांच्यावर खूप दबाव होता. विरोधी पक्षही या मुद्द्यावर एनडीएवर सतत प्रश्नचिन्ह उपस्थित करत होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यपालांनी त्यांना नुकतेच हंगामी मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारण्यास सांगितले आहे. मणिपूर निवडणुकीत भाजपच्या विजयानंतर, बिरेन सिंह यांनी केंद्रीय नेतृत्वाला आश्चर्यचकित केले आहे.

महिनाभरापूर्वी, बिरेन सिंह यांनी मणिपूर हिंसाचारावर म्हटले होते- मला माफ करा. महिन्याभरापूर्वी, मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह यांनी राज्यातील हिंसाचार आणि त्यात झालेल्या जीवितहानीबद्दल माफी मागितली होती. बिरेन सिंह म्हणाले होते की, संपूर्ण वर्ष खूप दुर्दैवी होते. मला याबद्दल खूप वाईट वाटते. ३ मे २०२३ पासून आजपर्यंत जे काही घडले आहे, त्याबद्दल मी राज्यातील जनतेची माफी मागतो.

सचिवालयात माध्यमांशी झालेल्या चर्चेदरम्यान मुख्यमंत्री बिरेन सिंह म्हणाले की, अनेक लोकांनी त्यांचे प्रियजन गमावले आहेत. अनेक लोक आपली घरे सोडून गेले. मला खरोखर वाईट वाटते. मला माफी मागायची आहे.

३ मे २०२३ पासून मणिपूरमध्ये कुकी-मैतेई समुदायातील हिंसाचार सुरू आहे. मैतेई-कुकी समुदायात हिंसाचार सुरू होऊन ६०० हून अधिक दिवस उलटून गेले आहेत.

बिरेन सिंह म्हणाले, 'मणिपूरमध्ये मे २०२३ ते ऑक्टोबर २०२३ पर्यंत गोळीबाराच्या ४०८ घटनांची नोंद झाली. नोव्हेंबर २०२३ ते एप्रिल २०२४ पर्यंत ३४५ कार्यक्रम झाले. मे २०२४ पासून ११२ घटनांची नोंद झाली आहे.

तथापि, गेल्या महिन्यापासून राज्यात शांतता आहे. हिंसाचाराची कोणतीही घटना घडली नाही. तुरळक निदर्शने झाली तरी लोक रस्त्यावर आले नाहीत. सरकारी कार्यालये दररोज उघडत आहेत आणि शाळांमध्ये मुलांची संख्या वाढत आहे.

## धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्यायची ताकद मुख्यमंत्र्यांमध्ये आहे का? - अंबादास दानवे



**बीड :** बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला आज दोन महिने झाले. दोन महिने उलटूनही या प्रकरणातील एक आरोपी अद्याप फरार आहे. तसेच या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचा हात असल्याचा आरोप होत आहे. त्यांचा राजीनामा कधी घेणार? की ती ताकद मुख्यमंत्र्यांच्या बाहुत नाही?, असा सवाल विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे.

दरम्यान अंबादास दानवे पुढे बोलताना म्हणाले की, धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड हे एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे उभ्या जगाला ज्ञात आहे. मग यांच्या संबंधांची तपासणी कधी होणार? असा सवाल X एक पोस्ट शेअर करत राज्य सरकारला, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काही सवाल केले आहे.

किती काळ कळ सोसायची देशमुख कुटुंबीयांनी. आज स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येलादोन महिने झाले. त्यानिमित्ताने हे प्रश्न आहेत माझे राज्य सरकारला..

१. कृष्णा आंधळे हा आरोपी अजून धरला गेलेला नाही. त्याच्या मुसक्या कधी अवळणार?

२. आरोपी न्यायालयीन कोठडीत असताना त्यांना परत सीआयडीने आपल्या कोठडीत घेऊन तपास चालवला होता. त्यात काय डेटा रिकव्हर झाला ते लोकांना कधी कळणार?

३. विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी समोर आली होती. त्यांच्या या नियुक्तीचे चार ओळींचे पत्र काढायला सरकारला अजून किती महिने लागणार?

४. धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड हे एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे उभ्या जगाला ज्ञात आहे. मग यांच्या संबंधांची तपासणी कधी होणार?

५. दरदिवशी नवे घोटाळे समोर येत असताना धनंजय मुंडे यांचा राजीनामा कधी घेणार? की ती ताकद मुख्यमंत्र्यांच्या बाहुत नाही?

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० फेब्रुवारी २०२५


## संधीचे सोने करुन मायबापाच्या घामाची कदर करा- गीतकार डॉ. विनायक पवार




**कन्नड (अरुण थोरात) :** शक्यतांची शक्यता वाढता त्याला शिक्षण म्हणतात. उच्च शिक्षण घेण्याची संधी हजारोतून तुम्हाली मिळाली त्या संधीचं सोनं करा. आजची तरुण पिढी मोबाइलच्या आहारी गेली. जो मोबाईल तुम्हाला वडिलांनी घेवून दिला त्याच्या अंगात फाटके कपडे असतात. मोबाईल हा सर्वात मोठा शत्रू आहे. त्याचा योग्य उपयोग करा. मायबापांच्या घामाची कदर नेहमी करा असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी व गीतकार डॉ. विनायक पवार यांनी केले. पुढे ते म्हणाले की, फार काळ लहान राहण्या एवढे आयुष्य मोठे नाही. गरिबीत जन्म हा काही तुमचा दोष नाही. स्त्रीयांना समाजात सन्मान मिळाला पाहिजे. बाई कमावती असली तरच तिला सन्मान मिळतो.महापुरुषांना जातीधर्मात अडकावयाची स्पर्धा लागली. विद्यार्थी दशेत अभ्यासाकडे विशेष लक्ष द्या हे सांगून त्यांनी आपली गीते व कविता सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली.माजी विद्यार्थी उपशिक्षणाधिकारी रोहिणी पवार यांना मनोगत व्यक्त केले. माझ्यासाठी हा आनंदाचा क्षण आहे. मला मोठया कार्यक्रमात सन्मानित केले. विद्यार्थी म्हणून हा माझा सन्मान आहे. या महाविद्यालयात माझी जडणघडण झाली. माणूस कितीही मोठा झाला तरी त्याचे जमिनीवरचे पाय कधी सुटू नये. परिस्थिती कशीही असू द्या मेहनतीने माणूस मोठा होऊ शकतो असे मत व्यक्त करून स्पर्धा परिक्षेविषयी मार्गदर्शन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी नियमित महाविद्यालयात हजर राहावे असे आवाहन केले.येथील शिवाजी महाविद्यालय, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय व रामराव अण्णा बहिरगावकर एम.सी.व्ही.सी. कनिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप व पारितोषीक वितरण कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कवी व चित्रपट गीतकार विनायक पवार व उपशिक्षणाधिकारी रोहिणी पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते तर व्यासपीठावर फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.राहुल क्षिरसागर, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, प्रभारी प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. प्रकाश महाजन, डॉ. अलका गडकरी , डॉ. विजय मातकर , उपप्राचार्य अभय आहेर, यांची उपस्थिती होती., प्रा. श्रीमती पवार व व रोहिणी पवार यांच्या मातोश्री चा यावेळी भेटवस्तू देवून सत्कार केला. सकाळी शेलापागोटे कार्यक्रम संपन्न झाला. पुढे बोलतांना कवी विनायक पवार म्हणाले की,पाहुण्यांचे स्वागत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वार्षिक स्नेह संमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या वादविवाद, काव्यवाचन , वक्तृत्व, रांगोळी, मेहंदी, क्रीडा स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात व विविध स्पर्धेत पारितोषीक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक प्रभारी प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे यांनी व पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रकाश खेत्री यांनी करून दिला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केला. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन डॉ. अतिश मेहेत्रे यांनी केले तर आभार यांनी मानले.

## ऐतिहासिक परभणी ते मुंबई लाँगमार्च करणाऱ्या भिमसैनिकांचे शहरात आंबेडकरवादी बहुजन विकास समितीच्या वतीने जाहीर सत्कार.



छत्रपती संभाजीनगर.संविधान शिल्पाच्या विटंबने नंतर परभणी येथे आंबेडकरी संघटनानी पुकारलेल्या बंदच्या दरम्यान काही समाज कंटकांनी या आंदोलनात घुसून दंगल सदृष परीस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता.यानंतर स्थानिक पोलीस प्रशासनाकडुन कॉंबींग ऑपरेशनच्या नावावर मोठ्या प्रमाणावर अत्याचार केला होता.या पोलीस मारहानित जखमी झालेले आंबेडकरी भिमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांना दुर्देवी मृत्यु झाला यानंतर आंबेडकरी चळवळीचे नेते विजय वाकोडे यांचेही दुर्देवी मृत्यु यामधे झाला होता यानंतर स्थानिक प्रशासनाकडुन सुरु असलेल्या दंडेल शाही विरोधात १७ जानेवारी रोजी ऐतिहासिक परभणी ते मुंबई लॉंगमार्चचे आयोजन करण्यात आले होते.आपल्या न्याय हक्कांसाठी संवैधानिक मार्गाने हज़ारों भिमसैनिकांनी पाई चालत शाषना विरोधात घोषणाबाजी करत थेट नाशिक गाठले. प्रचंड हजारों लाखोंच्या संख्नेने हा लॉंगमार्च मुंबई मंत्रालयावर धडकणार से शासणाच्या लक्षात आल्याने काल नाशिक येथे शाषणाच्या प्रतिनिधीनी यामध्ये यशस्वी मध्यस्ती करुण आंदोलन कर्त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत व काही मागण्या येत्या महीना भरात मार्गी लावण्यात येतील असे लेखी अश्वासन दिले आहे.यानंतर आंदोलन कर्त्यांनी नाशिक येथुन हा लॉंगमार्च यशस्वीपणे संपविला आहे,पण जर उर्वरीत मागण्या जर महीण्याभरात पुर्ण झाल्या नाहीत तर पुन्हा हा लॉंगमार्च नाशिक येथुन पुढे मुंबई मंत्रालयावर काढण्यात येईल असा ईशाराही शासनाला यावेळी देण्यात आला आहे. या ऐतिहासिक लॉंगमार्च यशस्वी करुण छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहरातुन परभणी येथे परतत असतांना संबोधी अकादमी येथे ऐतिहासिक लॉंगमार्चचे यशस्वी नेतृत्व करणार्या शिलेदार आशिष वाकोडे,भिमराव हत्तीहंभीरे,रवी सोनकांबळे, सिध्दार्थ भराडे,सुधीर साळवे,प्रदिप वाहुळे, निलेश डुमने, ललित कांबळे, सोनु भराडे, सागर मुंडे यांचा जाहीर सत्कार आंबेडकरवादी बहुजन विकास समितीच्या वतीने दिपक निकाळजे यांनी केला.

यावेळी भन्ते बोधीधम्मो, प्रांतोष वाघमारे, सचिन जोगदंडे, राजु चांदने, कमलेश नरवडे, नागेश केदारे, संतोष चव्हाण, निखिल निकाळजे, बाबासाहेब भराडे, विशाल जल्हारे दिपक गवळी दादाराव सोनट्टके व आंबेडकरवादी बहुजन विकास समिती व सर्व पक्षिय आंबेडकरवादी पक्ष संघटनांचे पदाधिकारी भिमसैनिक मोठ्या संख्नेने हजर होते.

## जगद्गुरु हिमांगी सखीवर प्राणघातक हल्ला, ममता कुलकर्णी महामंडलेश्वर होण्यास विरोध होता



**प्रयोगराज :** महाकुंभात ट्रान्सजेंडर जगद्गुरु हिमांगी सखीवर प्राणघातक हल्ला झाला. हिमांगी सखी गंभीर जखमी झाली आहे. किन्नर आखाड्याचे आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांनी त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे.

सेक्टर-८ मधील कॅम्पवर हा हल्ला करण्यात आला. त्याचे फुटेज समोर आले आहे. हिमांगी सखी म्हणाली की, लक्ष्मी नारायण तिच्यासोबत ५०-६० लोक घेऊन आली होती ज्यांच्याकडे त्रिशूळ आणि कुऱ्हाडीसारखी शस्त्रे होती. हिमांगी सखी ममता कुलकर्णी यांच्या महामंडलेश्वर म्हणून नियुक्तीला सतत विरोध करत होती.

किन्नर जगद्गुरु हिमांगी सखी म्हणाल्या- मी सध्या सेक्टर-८ मध्ये राहते. काल रात्री मी माझ्या सेवादारांसोबत छावणीत होते. रात्री ९.५० च्या सुमारास, किन्नर आखाड्याचे महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी पवित्रा, कलावती माँ, कौशल्या नंदगिरी उर्फ टीना माँ, कलकेश्वरी, आशानाथ यांच्यासह माझ्याकडे आले. हे लोक, १०-१२ वाहनांमधून ५० इतर लोकांसह, काठ्या, हॉकी स्टिक, रॉड, तलवारी, कुऱ्हाडी, त्रिशूळ आणि इतर शस्त्रे घेऊन माझ्या छावणीत घुसले.

माझ्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलिसाला अटक करण्यात आली. लक्ष्मीनारायण त्रिपाठी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मला मारण्याच्या उद्देशाने माझ्यावर हल्ला केला. मला लाथा, बुक्के, मारहाण आणि काठ्यांनी खूप मारहाण करण्यात आली. यामुळे मला गंभीर दुखापत झाली. माझे सर्व नोकर या लोकांकडे विनवणी करत राहिले. पण, या लोकांनी कोणाचेही ऐकले नाही. या लोकांनी माझ्याकडे असलेले सुमारे १० लाख रुपये आणि सोन्याचे दागिने लुटले.

जाताना लक्ष्मीनारायण त्रिपाठी आणि त्यांच्या साथीदारांनी मला शिवीगाळ केली आणि धमकी दिली. जर तुम्ही लक्ष्मीनारायण त्रिपाठी यांच्याविरुद्ध मीडियामध्ये अशी विधाने करत राहिलात तर आम्ही तुम्हाला मारून टाकू. या घटनेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग सीसीटीव्हीमध्ये आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० फेब्रुवारी २०२५


## युवा जल्लोषमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो - नाट्य व सिने अभिनेते राजू पाटोदकर



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** युवा जल्लोषमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असून जीवनात मिळालेली ही सुवर्ण संधी आहे, युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा. या सहभागामुळेच मी नाट्य व सिनेक्षेत्रात नावलौकिक कमवू शकलो, असे प्रतिपादन मराठी नाट्य व सिने अभिनेते श्री राजू पाटोदकर यांनी जालनाच्या जेईएस महाविद्यालयाच्या 'युवा जल्लोष' महोत्सवात पारितोषिक वितरण कार्यक्रमात केले.जेईएस महाविद्यालय जालना येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी दरवर्षाप्रमाणे यावर्षीही 'युवा जल्लोष-२०२५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक व युवक महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी नाट्य व सिने अभिनेते श्री राजू पाटोदकर हे होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. हेमंत वर्मा, युवा जल्लोष कार्यक्रमाचे प्रमुख डॉ.गणेश कुलकर्णी, विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष तन्मय अग्निहोत्री, विद्यार्थी प्रतिनिधी कु. तेजस्विनी राऊत आदींची उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष तन्मय अग्निहोत्री यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी आधुनिक सोयी-सुविधा पुरवून, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल, व गुणवत्ता वाढीकरता ,वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करावे, असेही तन्मय अग्निहोत्री यांनी सांगितले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मराठी नाट्य व सिने अभिनेते श्री राजू पाटोदकर म्हणाले की, आजची पिढी खूप फास्ट असून तुमच्याकडे शिकण्यासारखे खूप काही आहे. तुमचं करिअर उत्तम व्हावं म्हणून महाविद्यालयामध्ये स्नेहसंमेलनचे आयोजन केले जाते. यामधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे, यामधूनच मोठमोठे कलावंत व व्यक्ती घडत असतात.शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी -शिक्षक दोघे घटक महत्त्वाचे आहेत, नाट्य व सिनेमा हे क्षेत्र शुद्ध असून यामध्ये युवकांनी सहभागी व्हावे , कलावंत म्हणून नावलौकिक कमवावा, असेही श्री पाटोदकर यांनी सांगितले. श्री राजू पाटोदकर यांनी नाटक व सिनेमा पटकथा लिहिल्या आहेत, त्यांनी दिग्दर्शनही केलेले आहे, टीव्हीवरील वेगवेगळ्या मालिकेतही त्यांनी काम केलेले आहे, महाराष्ट्रातील ते एक अष्टपैलू व्यक्तिमत्व असून त्यांनी 'आमदार सौभाग्यवती 'नाटकाचा किस्सा सांगितला व नाट्य क्षेत्राचा जीवनात कसा फायदा होतो हे रहस्य उपस्थितीना उलगडून सांगितले. जवळपास ३५ वर्षापासून मी या क्षेत्रात कलावंत म्हणून काम करीत असल्याचेही श्री. पाटोदकरांनी सांगितले.यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, मराठवाड्यातील युवकांनी कूस बदललेली असून, देशात सर्व क्षेत्रात आपला झेंडा रोवला आहे, श्री.राजू पाटोदकर हे सुद्धा मराठवाड्यातले मूळचे आहेत, आज नाट्य व सिने क्षेत्रात मराठवाड्यातील अनेक कलावंत आहेत. जेईएस महाविद्यालयाने सामाजिक, राजकीय ,आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात अनेक व्यक्तींना घडवलेले आहे, मराठवाड्यात ज्ञानदान क्षेत्रात जेईएस महाविद्यालय उत्तम कार्य करत असून, यापुढे करत राहील, असे सांगून,महाविद्यालयाचा वार्षिक अहवालाचे त्यांनी वाचन केले. आम्ही अष्टपैलू व आदर्श नागरिक घडवण्याचे काम करत असल्याचेही प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.या कार्यक्रमासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. यशवंत सोनुने यांनी केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन युवा जल्लोषचे प्रमुख प्रा. डॉ.गणेश कुलकर्णी यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. खंडागळे यांनी मानलेत.



"एक ओळ लिहिती राहिली पाहिजे माझ्यानंतरही" हे ब्रीद घेऊन जगणारे आशयघन शब्दांचे धनी सुप्रसिद्ध कवी सुनील उबाळे यांनी आपला "उलट्या कडीचं घर" हा कविता संग्रह दैनिक महाराष्ट्र जनशक्ती आणि एमजे न्यूज चॅनलचे मुख्य संपादक प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांना सस्नेह भेट दिला, याप्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यिका व कवयित्री माधुरी चौधरी, 'भोगवटाकार' सुदाम मगर उपस्थित होते.

## मी श्रद्धाळू, पण अंधश्रद्धाळू अजिबात नाही पंकजा मुंढे

**नाशिक :** स्वामींच्या कृपेने मला पर्यावरण खात्याची जबाबदारी मिळाली. मी श्रद्धाळू आहे, पण अंधश्रद्धाळू अजिबात नाही. गणपती दूध पितो असलेल्या अंधश्रद्धांवर माझा विश्वास नाही. आपण विज्ञानाशी सांगड घातली पाहिजे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज दिंडोरी येथील अण्णासाहेब मोरे म्हणजे गुरु माऊली यांच्या आश्रमाला भेट दिली असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बोलताना नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभवरही भाष्य केले.

आज नाशिक येथील स्वामी समर्थ केंद्र प्रणीत जागतिक कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला पंकजा मुंडे यांनी हजेरी लावली. पंकजा मुंडे यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावल्याने अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत. कारण सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे फरार असताना दिंडोरी येथील स्वामी समर्थ केंद्रात गेल्याचा आरोप भूमाता ब्रिगेडच्या प्रमुख आणि सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला होता. त्यातच आज पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे नाशिकच्या दौऱ्यावर असून स्वामी समर्थ केंडरच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली आहे.

पर्यावरण खात्याची जबाबदारी माझ्यावर स्वामींच्या कृपेने पडली आहे. मी अंधश्रद्धाळू अजिबात नाही माझ्या बाबांचा गणपती दूध पेत नव्हता मी श्रद्धाळू आहे. स्वामींची कृप महादेवाचे वाहन नदी, ज्या देवांचा विचार करतो प्रत्येक देवाण मागे प्राणी असतात. विज्ञानाशी सांगड घातली पाहिजे. सोन्याच्या मोहरा पुढच्या पिढी साठी काम येणार नाही. तहान लागल्यावर पाणीच लागेल, असे पंकजा मुंडे माध्यमांशी बोलताना म्हणाल्या.

पंकजा मुंडे यांनी यावेळी महाकुंभ मेळ्यावरही प्रतिक्रिया दिली. प्रयागराजमध्ये कुंभ आहे. त्या ठिकाणी अनेक तपस्वी आहेत. आधी त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी तिथे जायचे, आता कुंभ पाहायला जातात. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभला थोडी जबाबदारी आली, असे त्या म्हणाल्या. कुंभमध्ये आपल्याला चांगले काम करायचे आहे. गो मातेचे संवर्धन करायचे आहे. बांधकाम करण्याआधी माझ्या परवानगी लागते, बांधकामाच्या आधी त्या ठिकाणी झाडे लावा, असा इशारा पंकजा मुंडे यांनी बिल्डर लोकांना दिला.

आपण ज्या भूमिकेतून काम करतो, ती जगाला दिली पाहिजे. मला अगोदर प्रश्न पडला पर्यावरणात कसे काम करावे. माझ्या या सर्व कार्यात स्वामींचा आशीर्वाद पाठीमागे राहील. चांगले कामाच्या पाठीमागे उभे राहण्याचा वारसा आम्हाला मिळाला आहे. अशा कार्यक्रमांमध्ये उपक्रमांमध्ये मी नेहमीच आपल्याला दिसेल, असेही पंकजा मुंडे यांनी सांगितले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० फेब्रुवारी २०२५

# बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर जाती अंताच्या विचारधारेतले परिवर्तनवादी महामानव - प्रा. सुकुमार कांबळे





**छत्रपती संभाजीनगर (डॉ. बाळासाहेब गायकवाड)** : हिंदू राहणं म्हणजे गुलाम राहणं होय. कारण या धर्माला कुठलाही संस्थापक नाही म्हणून धर्माचं भूत आपल्या मनावर बिंबवणे चालु आहे. यामुळे वेळीच आपल्या समाज बांधवांनी सावध झालं पाहिजे. कारण डॉ. बाबासाहेबांनी प्रत्येक भारतीयांना मतपेटीतून सत्तेवर येण्याचं भारतीय संविधानातून स्वातंत्र्य दिलं असल्याचं प्रतिपादन प्रा. सुकुमार कांबळे यांनी पी.ई.एस. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांच्या विद्यमाने आयोजित तिसऱ्या फुले-शाहू-आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून व्यक्त केले.

यावेळी मंचावर उद्घाटक प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, स्वागताध्यक्ष डॉ. ऋषीकेष कांबळे, डॉ. देवदत्त म्हात्रे, प्रा. श्रीधर नांदेडकर, प्राचार्य अभिजित वाडेकर, धन्यकुमार टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. मोहन सौंदर्य, सचिव डॉ. युवराज धबडगे, उपाध्यक्ष डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. मिलिंद वाव्हळे, डॉ. बाळासाहेब गायकवाड आदींची मंचावर उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. सुकुमार कांबळे यांनी मातंग समाजाकडून बौद्ध धम्माकडे झालेला त्यांचा प्रवास यावर आणि आजच्या राजकारणावर, समाजकारण, हिंदू धर्मातील अनिष्ठ प्रथा आदींवर परखडपणे भाष्य केले.

त्याचबरोबर संमेलनाचे उद्घाटक प्रा. प्रल्हाद लुलेकर यांनी म्हटले की, फुले-शाहू-आंबेडकरांचा विचार माणसांच्या विवेकाला जागृत करतो. कारण इथल्या समाजव्यवस्थेने शिक्षणाची द्वारे बंद करण्याचा घाट घातला आहे, असे सांगून त्यांनी फुले-शाहू आंबेडकरांनी माणसाच्या जगण्यावर भाष्य केले असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने या देशाचे खरे भाग्यविधाते ठरतात. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेने आयोजित केलेले हे साहित्य संमेलन फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा वाहक बनत चालला आहे. याचा मला मनापासून आनंद आहे.

यावेळी डॉ. देवदत्त म्हात्रे, कवी श्रीधर नांदेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या संमेलनामागची भूमिका डॉ. मोहन सौंदर्य यांनी मांडली. स्वागताध्यक्ष डॉ. ऋषीकेश कांबळे यांनी स्वागतपर भाषण केले. प्राचार्य अभिजित वाडेकर, धन्यकुमार टिळक आदींनी आपले मनोगत व्यक्त करून या संमेलनाच्या शुभेच्या दिल्या.

सुरूवातीला सकाळी 8.30 वा संविधान रॅलीने संमेलनाला लुंबिनी वनातून बाबासाहेबांना अभिवादन करून मिलिंद मल्टीपर्पज विद्यालयातून लेझिम पथकाच्या माध्यमातून वाजत-गाजत, ढोल ताशांच्या सुंदर संचालनाने या संमेलनाला रंगत आणली. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यामध्ये ज्येष्ठ पत्रकार स. सो. खंडाळकर, डॉ. गणेशराज सोनाळे, मा. व्ही. के. वाघ, ॲड. एस. आर. बोदडे, बापुसाहेब सोनवणे यासह शहरातील अनेक मान्यवर रसिक श्रोत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी डोळसे यांनी तर आभार डॉ. मिलिंद वाव्हळे यांनी मानले.

# मुदतवाढ न दिल्यास कृषी मंत्र्यांच्या दारात सोयाबीन ओतणार

**बीड** : सरकारी सोयाबीन खरेदीची मुदत संपली असून, त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. कारण अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी अजून बाकी आहे, तरीही सरकारी खरेदी बंद करण्यात आली आहे. या मुद्द्यावर किसान सभा आक्रमक झाली आहे. सरकारने खरेदी केंद्रांची मुदत वाढवून पुन्हा सोयाबीन खरेदी सुरू करावी, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी दिला. तसेच, मुदतवाढ न दिल्यास कृषी मंत्र्यांच्या दारात सोयाबीन ओतणार असल्याचेही नवले यांनी स्पष्ट केले.

सोयाबीन खरेदी बंद केल्याने अनेक शेतकरी वंचित राहिले आहेत. लाखो शेतकऱ्यांचे सोयाबीन पडून आहे आणि खरेदी केंद्राबाहेर अजूनही शेतकऱ्यांच्या रांगा लागलेल्या आहेत, असे अजित नवले यांनी म्हटले. सोयाबीन खरेदी बंद झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. त्यामुळे सरकारने खरेदी केंद्रांची मुदत वाढवून पुन्हा सोयाबीन खरेदी सुरू करावी, अशी मागणी अजित नवले यांनी केली आहे. अन्यथा, किसान सभा राज्यभर आंदोलन छेडणार असून, कृषीमंत्र्यांच्या घरावर सोयाबीन ओतणार असल्याचा इशारा त्यांनी सरकारला दिला.

बीड जिल्ह्यात नाफेडच्या सोयाबीन खरेदी केंद्राबाहेर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. अनेक सोयाबीन उत्पादक शेतकरी दिवस-रात्र सोयाबीन केंद्राबाहेर ठाण मांडून आपल्या सोयाबीन विक्रीसाठी थांबले आहेत, तरीही त्यांची सोयाबीन अद्याप विकली गेली नाही. ६ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीन खरेदीची मुदत होती, पण ती संपल्यानंतर शेतकरी आता पुन्हा मुदतवाढ मिळावी अशी मागणी करत आहेत.

बीड जिल्ह्यात नाफेडचे ३० सोयाबीन खरेदी केंद्र आहेत. या खरेदी केंद्राच्या माध्यमातून अर्ध्या शेतकऱ्यांचे देखील सोयाबीनची खरेदी झालेली नाही. तर ४४७४४ शेतकऱ्यांनी नाफेडकडे नोंदणी केली होती. परंतु, झालेल्या खरेदीतही बारदाना, कडता, हमालीच्या नावावर शेतकऱ्यांची लुट केली जात आहे. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे संपुर्ण सोयाबीन हमीभावाने खरेदी करावे अशी मागणी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांकडून केली जाते आहे.

संपूर्ण राज्यामध्ये सोयाबीन खरेदी मोठ्या प्रमाणावर होत असताना काल या सोयाबीन खरेदीची मुदत संपली आहे. त्यानंतर राज्यातील बहुतेक जिल्ह्यात सोयाबीन खरेदीला मुदत वाढ मिळण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० फेब्रुवारी २०२५


## महात्मा पब्लिक स्कूलच्या बालकलाकारांचा कलाविष्कार ! स्नेहसंमेलनामध्ये उदगीरवासीय झाले मंत्रमुग्ध




**उदगीर (सुधीर पंचगल्ले) :** स्वामी विवेकानंद ग्रामसेवा प्रतिष्ठान द्वारा संचलित येथील देगलूर रोडवरील नाईकनगर चौक स्थित महात्मा पब्लिक स्कूल मध्ये दि.०७ जानेवारी शनिवारी रोजी दु. ४ वाजता रघुकुल मंगल कार्यालयात स्नेहसंमेलन पार पडले. या कार्यक्रमांमध्ये महात्मा पब्लिक स्कूलच्या स्थापनेपासूनच्या परंपरेला व सांस्कृतिक साजेसा असा उत्कृष्ट , कलाउत्कृष्ट व विद्यार्थ्यांच्या अद्भुत कला गुणांना वाव देणारा असा सांस्कृतिक कार्यक्रम व प्रथम, द्वितीय, तृतीय येणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थिनींना यावेळी सन्मानित करण्यात आले. तसेच स्कूलच्या अनेक विद्यार्थ्यांना अनेक विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्तमपणे बालाविष्कार, कलाविष्कार सादर केला. कार्यक्रमाची सुरुवात प्रथमतः स्वामी विवेकानंद व विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन व दीप प्रज्वलानी करण्यात आली. अध्यक्षस्थानी नवनिर्माण फाउंडेशनचे अध्यक्ष विश्वास पडीले हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मेडिकल व औषधी असोसिएशनचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष सत्यवान बोरोळकर, उदगीर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, उदगीर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष सुधीरभाऊ भोसले, भाजपाचे शहराध्यक्ष मनोज दादा पुदाले, महिला आघाडीच्या उत्तराताई कलबुर्गे, ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दीपक नेत्रगावेपाटील, सचिव सौ.संगीताताई दिपकराव नेत्रगावेपाटील, राष्ट्रवादी कला व सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, मानकीचे माजी सरपंच सतीश पाटील मानकीकर, ग्राहक संरक्षण परिषदेचे शासननियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती व सिद्धी करिअर ॲकाडमीच्या संचालिका सौ.नंदाताई स्वामी, शांतकुमार स्वामीसर, जिजामाता महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.संध्या बालासाहेब शिंदे अतनूरकर, सामाजिक कार्यकर्त्या चंचलाताई हुगे उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये बालकलाकारांचा कलाविष्कार बक्षिसांची व या शाळेची गुणवला, उपक्रमशीलता, नैपुण्य हे इतरांपेक्षाही आगळे वेगळे व नजरेत भरणारे होते. यामध्ये लहान बालकांनी, विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोककला लावणी, धनगर गीते, भक्ती गीते, लोकगीते, राष्ट्रगीते, रिमिक्स गाणे, मनोहर नृत्यांसह सादर करून उपस्थितांची मने जिंकली. रंगीबेरंगी विद्युत रोषणाई, कर्ण मधुर संगीत व प्रेक्षकांचा अमर्यादा त्यामुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. प्रथम, द्वितीय, तृतीय, चर्तुथ क्रमांक विद्यार्थ्यांचे व मातापालकांचे ट्रॉफी सन्मानचिन्ह देऊन स्वागत व अभिनंदन करून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला विविधता होती. विद्यार्थ्यांचे विविध कलागुणांचा अविष्कार होता. कार्यक्रमाची विशेष म्हणजे कुमारी साक्षी संगीताताई दीपकराव नेत्रगावेपाटील, या आडीचतीन वर्षांच्या चिमुकल्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकवृंद्ध, कर्मचारी यांनी तसेच शाळेचे मुख्याध्यापक आनंदा चिंचोले यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक आनंद चिंचोले यांनी केले. प्रास्ताविक भाषण स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दीपकराव नेत्रगावेपाटील यांनी केले. आभार स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या संस्थापिका सचिव तथा प्राचार्या सौ.संगीताताई दिपकराव नेत्रगावेपाटील यांनी मानले. आभार प्रदर्शन नंतर कार्यक्रम संपला. विशेष कार्यक्रम संपेपर्यंत सर्व पालक वर्ग, माता भगिनी हजर होत्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महात्मा पब्लिक स्कूल शाळेचे मुख्याध्यापक आनंद चिंचोले यांनी केले. तसेच महात्मा पब्लिक स्कूल शाळेच्या सर्व शिक्षिका वृंद व कर्मचाऱ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनातील वेशभूषा व इतर महत्त्वाच्या बाबी प्रभावीपणे सांभाळून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हातभार लावला. हा कार्यक्रम सर्वांच्या मेहनतीने यशस्वी झाला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दिवसरात्र, अहोरात्र मेहनत, परिश्रम घेणाऱ्या संस्थेच्या संचालिका तथा प्राचार्या सौ.संगीताताई दिपकराव नेत्रगावेपाटील यांचा सुद्धा यावेळी सत्कार करून सन्मान करण्यात आला.

## आ. संजना जाधव यांच्या वाढदिवसा निमित्त कन्नड शहरात स्वच्छता अभियान



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्याच्या आमदार संजना जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त कन्नड शहरातील शिवसैनिकांनी आगळावेगळा कार्यक्रम राबविला. पिशोरनाका येथे प्रतिष्ठित व्यापारी, नागरिक, शिवसैनिक व फळ विक्रेते यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम शुभारंभ करण्यात आली या ठिकाणी प्रतिष्ठित व्यापारी विनोद जैन व सामाजिक कार्यकर्ते शेख युनूस यांच्या शुभहस्ते नारळ फोडून स्वच्छता मोहीम ला सुरुवात करण्यात आली. कन्नड शहरांमध्ये नुकतीच आमदार संजना जाधव यांनी नगरपालिका मध्ये एक बैठक घेऊन स्वच्छता संदर्भात प्रशासकीय अधिकारी यांना निर्देशित केले होते की कन्नड वासियांना स्वच्छ पाणी, चांगले आरोग्य, आणि स्वच्छता याकडे लक्ष द्यावे. याचाच धागा धरून कन्नड नगरपालिकेचे मा. उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील यांनी संपूर्ण कन्नड शहरात मुख्य बाजार पेठे मध्ये असलेले डिव्हायडर च्या बाजूची माती व घाण स्वच्छ करण्याची मोहीम आज आमदार संजना जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त राबवली.

व्यापारी पेठा तील सर्व व्यापारी यांनी या कार्य बद्दल आमदार संजना जाधव यांचे आभार मानले. कन्नड शहरातील मुख्य रस्ता पीशोर मार्गे येणारा टेलिफोन भवन पासून तर पीशोर नाका व पीशोर नाका ते कोर्ट, बस स्टँड रोड मकरंदपूर च्या पूल पर्यंत पर्यंत आज डीवाईडर च्या दोन्ही बाजूची स्वच्छता करण्यात आली. व मकरंद पुलावरील फुटपाथ स्वच्छ करण्यात आले या कामा वरती जाऊन स्वतः आमदार संजनाताई जाधव यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. सदरील घाण व माती उचलून या ठिकाणी चाळीसगाव रोड टँकरच्या पाण्याने स्वच्छ धुण्यात आले.

या प्रसंगी माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील, उप शहर प्रमुख चंद्रकांत लाडे, शिवाजी थेटे उप तालुका प्रमुख, सरपंच अशोक दाबके, उप शहर प्रमुख सलमान शेख, उपशहर प्रमुख लक्ष्मीकांत सुरे, कामगार आघाडीचे किसन भालेराव, सचिन गिरे, शंकर जाधव, आकाश गंगवाल, सुनील सुरे, भारत बेडवाल, रवी चौगुले, पवन बेडवाल, राजू शिंदे, पाणी टँकर चालक श्री निंभोरकर यांनी परिश्रम घेतले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com